२३३ दिनांक १०/९

प्रवरा मेडिकल ट्रस्ट

प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, लोणी, जि. अहमदनगर येथे भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र. टीएमसी-१५९३/७०७/प्र.क्र.-१४०/९३/शिक्षण-२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ८ जानेवारी १९९७.

वाचा:- १) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. डिएमईआर/-३०७०/३/फ, दि. १.३.१९९६.

२) कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांचे पत्र क्र. मार/२/२९/९६-९७/२११०, दि. २२.८.९६.

प्रस्तावना:- प्रवरा मेडिकल ट्रस्ट, अहमदनगर या संस्थेने प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, लोणी, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर येथे नवीन भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला होता. सदरहू संस्थेस भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्यास तसेच सन १९९६-९७ च्या प्रथम वर्षापासून विद्यार्थी प्रवेश करण्यास पुणे विद्यापीठाने त्यांचे पत्र क्रमांक मार/२/२९/९६-९७/२११०, दि. २२.८.१९९६ अन्वये मंजुरी दिली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनीही प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांच्या लोणी जि. अहमदनगर येथील प्रस्तावित भौतिकोपचार महाविद्यालयास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस केली आहे. प्रस्तावित भौतिकोपचार महाविद्यालयास येत्या शैक्षणिक वर्षापासून मान्यता देण्याचा शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय:- प्रवरा मेडिकल ट्रस्ट, अहमदनगर या संस्थेस प्रवरा ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय लोणी, ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे भौतिकोपचार महाविद्यालय सुरु करण्यास पुणे विद्यापीठाने केलेली शिफारस लक्षात घेता सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून शासन मान्यता देत आहे. सदर मान्यता सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२. या महाविद्यालयातील प्रवेश [illegible] संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन करतील.

३. हा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अरविंद बोथरा )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट - अ

१] सदरची मान्यता केवळ ३ वर्षांकरिता तात्पुरती देण्यात येत असून त्यानंतर प्रत्येक वर्षी निरीक्षणाअंती मान्यता पुढे चालू ठेवण्याबाबत विचार करण्यात येईल.

२] महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ५० इतकी असेल.

३] वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश, रिट पिटीशन क्रमांक ८०७/९२-जे. उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्र प्रदेश शासन या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने विहित केलेल्या योजनेनुसार, राज्य शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केले जातील.

४] राज्य शासनाने भौतिकोपचार महाविद्यालयाबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५] महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्स [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी] ॲक्ट, १९८७ [महाराष्ट्र ॲक्ट ६ ऑफ १९८८] मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

६] संस्था, आवर्ती/अनावर्ती खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

७] राज्यातील सर्व भौतिकोपचार महाविद्यालयाबाबत एकसूत्रता राहण्याच्या दृष्टीने या अभ्यासक्रमाचा कालावधी नागपूर विद्यापीठाने विहित केल्यानुसार ४½ वर्षांचा राहील या दृष्टीने पुणे विद्यापीठाकडे संबंधित संस्थेने पाठपुरावा करून याबाबतीत जरूर ती मान्यता मिळाल्यानंतरच संस्थेने सदर महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता राहील.

....

# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक :
३५६०६१
३५००६२
३५०,०६०

तारेचा पत्ता : 'युनिपुना'

गणेशखिंड, पुणे-४११००७.

दिनांक :

सौर :

संदर्भ :


जा.क्र. सीए/ए/नव्याने संलग्नीकरण/
९६-९७/ ८६२

दिनांक: १३/३/१९९७

प्रति, -

मा. अध्यक्ष,
प्रवरा मेडिकल ट्रस्ट,
लोणी-४१३७१३
ता. श्रीरामपूर
जि. अहमदनगर

विषय: शैक्षणिक वर्ष १९९७-९८ पासून नवीन भौतिकोपचार महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ: वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे महाराष्ट्र शासन याचे पत्र क्रमांक डीएससी-१५९३/सीआर-१४८/९३ शिक्षण-१ दिनांक ८ जानेवारी १९९७

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भात मला प्राप्त झालेल्या आदेशानुसार, आपणास असे कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, आपल्या संस्थेस लोणी ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे भौतिकोपचार महाविद्यालय (साडेचार वर्ष मुदतीचा फिजिओथेरपी पदवी अभ्यासक्रम ∠ प्रथम वर्ष बॅचुलर ऑफ फिजिओथेरपी) शैक्षणिक वर्ष १९९७-९८ पासून, दोन वर्षासाठी, ५८ विद्यार्थी प्रवेश-क्षमतेस, कायम विनाअनुदान तत्वावर अहवालात नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

विद्यापीठाने व शासनाने वेळोवेळी विहित केलेले नियम आपणास बंधनकारक राहतील याची कृपया नोंद घेण्यात यावी. पत्रासोबत चौकशी समितीच्या अहवालाची प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही-साठी पाठविली आहेत.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिवांकरिता.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना:

१. मा. सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

२. मा. सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२

३. मा. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग

४. मा. उपकुलसचिव, परीक्षा समन्वय विभाग

५. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक (प्रवेश)

६. मा. उपकुलसचिव, नियोजन व विकास विभाग

७. कक्षाधिकारी, निवडणूक विभाग

८. कक्षाधिकारी, डाटा प्रोसेसिंग युनिट,

९. कक्षाधिकारी, सिंगल विंडो सिस्टिम

१०. कक्षाधिकारी, मान्यता विभाग

११. कक्षाधिकारी, विद्याशाखा व अभ्यासमंडळ कक्ष

१२. कक्षाधिकारी, शैक्षणिक पात्रता विभाग